RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१७९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.१० ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## बांगलादेशमध्ये आंदोलनाचे सत्र सुरुच सर्वोच्च न्यायालयास घेराव

### सरन्यायाधीशांनी केली राजीनाम्याची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० ढाका**

शेख हसीना यांना पंतप्रधान पदाचा राजीनामा दिल्यानंतरही बांगला देशमधील आंदोलनाचे सत्र सुरूच राहिले आहे. आज (दि. १० ऑगस्ट) आंदोलकांनी बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाला घेराव घातला. यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश ओबेदुल हसन यांनी राजीनामा देणार असल्याची घोषणा केली आहे, असे वृत्त बांगला देशमधील 'द डेली स्टार'ने दिले आहे. निदर्शनादरम्यान आंदोलकांनी मुख्य न्यायाधीश



आणि अपील विभागाला दुपारी १ वाजेपर्यंत राजीनामा द्यावा अशी मागणी करत राजीनामा न दिल्यास सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश आणि सरन्यायाधीशांच्या निवासस्थानावर धडक देऊ, असा इशारा आंदोलकांनी दिला होता.

आज सकाळी १०.३० वाजेपर्यंत विद्यार्थी आणि वकिलांसह शेकडो आंदोलक सर्वोच्च न्यायालयाच्या संकुलात जमा होऊ लागले. निदर्शनादरम्यान त्यांनी सरन्यायाधीश आणि अपील विभागाला राजीनामा देण्याचा इशारा दिला.सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांनी दिलेल्या मुदतीत राजीनामा न दिल्यास त्यांच्या निवासस्थानाला घेराव घालण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला होता. बांगलादेशमध्ये आंदोलकांनी न्यायालय परिसराला घेराव घातल्यानंतर सरन्यायाधीश ओबेदुल हसन यांनी राजीनामा देण्याची घोषणा केली.देशभरातील सर्वोच्च न्यायालय आणि कनिष्ठ न्यायालयांच्या न्यायाधीशांच्या सुरक्षेचा विचार करून त्यांनी पद सोडण्याचा निर्णय घेतल्याचे मुख्य न्यायमूर्ती माध्यमांना सांगितले. शनिवारी सायंकाळपर्यंत राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांना राजीनामा पत्र पाठवणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, अंतरिम सरकारच्या क्रीडा मंत्रालयाचे सल्लागार असिफ महमूद यांनीही मुख्य न्यायाधीश ओबेदुल हसन यांचा बिनशर्त राजीनामा द्यावा, अशी मागणी केली आहे.

## परमबीर सिंग यांनी केलेले विधान सत्य; मला अटक करायचे प्रयत्न झाले, पण...: देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० मुंबई**

गेल्या काही दिवसांपासून माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी खळबळजनक दावे केले असून, यावरून राजकीय वर्तुळात अनेक प्रतिक्रिया उमटल्या. राजकीय फायद्यासाठी विरोधकांवर खोटे गुन्हे दाखल करण्यासाठी मविआतील नेत्यांकडून माझ्यावर दबाव आणला जात होता, असा मोठा दावा परमबीर सिंग यांनी केली. यासंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली.

मीडियाशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी एवढेच सांगेन की, त्यांनी मला आणि भाजपातील काही नेत्यांना अटक करण्याच्या संदर्भात जे काही वक्तव्य केले आहे, ते पूर्णपणे सत्य आहे. याचा सगळा प्रयत्न झाला. त्यांनी एकच घटना सांगितली. परंतु, असे चार इन्सिडंट आहेत. यामध्ये खोट्या केसेस करून मला कशी अटक करता येईल, याचे षडयंत्र झाले. हे सगळे षडयंत्र झाले, त्यावेळी आम्ही त्याचा पर्दाफाश करू शकलो, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



**आजही अनेक व्हिडिओ पुरावे आहेत**

या सगळ्याचे व्हिडिओ पुरावे आम्ही सीबीआयला दिले. आजही अनेक व्हिडिओ पुरावे आहेत. एक गोष्ट निश्चितपणे सांगतो की, महाविकास आघाडीच्या सरकारच्या काळात मी असेन, गिरीश महाजन असतील, प्रवीण दरेकर असतील, असे आमचे अनेक नेते आहेत, ज्यांना जेलमध्ये टाकायची सुपारी काही अधिकाऱ्यांना दिली होती. काही अधिकाऱ्यांनी घेतली होती. परंतु, ती गोष्ट ते करू शकले नाहीत. कारण, अनेक चांगले अधिकारी होते, ज्यांनी त्या त्या वेळी त्या त्या स्तरावर अशा प्रकारच्या खोट्या केसेस करायला नकार दिला, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले.

## ज्येष्ठ अभिनेते विजय कदम यांचे कॅन्सरने निधन वयाच्या ६७ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० मुंबई**

मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेते विजय कदम यांचं निधन झालंय. ते ६७ वर्षांचे होते. विजय कदम गेल्या अनेक वर्षांपासून मराठी रंगभूमी आणि सिनेसृष्टीत कार्यरत होते. कॅन्सरची झुंज अपयशी झाल्याने विजय कदम यांनी आज सकाळी अखेरचा श्वास घेतला. अंधरी येथील स्मशानभूमीत आज त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. विजय कदम यांच्या निधनाने हरहुन्नरी कलाकार हरपल्याची भावना सर्वांच्या मनात आहे.

**विजय कदम यांच्या विनोदी भूमिका गाजल्या**

विजय कदम हे गेली अनेक वर्ष मराठी मनोरंजन विश्वात सक्रीय होते. नाटक, सिनेमे, जाहिराती अशा माध्यमांत कार्यरत होते. काही महिन्यांपूर्वी त्यांनी क्रिकेटपटू रिषभ पंतसोबत एका जाहिरातीमध्ये काम केलं होतं. ही





जाहिरात प्रचंड गाजली. विजय कदम यांनी १९८०-९० च्या काळात रंगभूमीवर केलेल्या विनोदी भूमिका प्रचंड गाजल्या. 'सही दे सही', 'विच्छा माझी पुरी करा', 'पप्पा सांगा कुणाचे' आणि 'टूरटूर' या नाटकांमध्ये त्यांनी केलेल्या भूमिका चांगल्याच लोकप्रिय ठरल्या.

## अखेर राज ठाकरेंनी तोफ डागली, महाराष्ट्रातील थेट दोन मोठ्या नेत्यांना घेतलं अंगावर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० छत्रपती संभाजीनगर**

८माझ्या दौऱ्यात जरांगे पाटलांचा काहीच संबंध नव्हता. त्यांचा विषयही नाही. त्यांच्या आंदोलनामागून शरद पवार आणि उद्धव ठाकरे सारखी मंडळी ज्या प्रकारचं राजकारण करत आहेत, ते मला मराठवाड्यात दिसतंय. यातील दुर्देवाचा भाग म्हणजे काही पत्रकार या गोष्टीत इन्व्हॉल्व झाले आहेत. मला त्यांची नावेही माहीत आहेत. योग्य ठिकाणी जातील आणि चौकशी होईल असं राज ठाकरे म्हणाले. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. कुणाला पेव्हर ब्लॉकची कामे मिळाली, कुणाला एमआयडीसीत जागा मिळाली. कुणाला किती पैसे मिळाले आणि त्यातून कशा गाड्या घेतल्या गेल्या. अशा सर्व गोष्टी माझ्या कानावर आल्या आहेत. मी जेव्हा धाराशीवला होतो. तेव्हा धाराशीवला काही लोक भेटायला आले. त्यांना भडकवण्याचं काम काही पत्रकार करत होते. मी त्यांना सांगितलं तुम्ही या, तेव्हा तुम्ही खाली जा असं सांगणारे पत्रकार होते. माझ्यासोबत कोण येणार



इथपर्यंत प्रकरण झालं असं राज ठाकरे म्हणाले.

त्यातील दोन पत्रकार होते ते पूर्वीचे शरद पवार यांच्या जवळचे आहेत असं म्हणतात. त्यांचे फोटोही आहेत, तुतारी बरोबर पूर्वीचे फोटो कसे असतील हे मला कळलं नाही. उद्धव ठाकरे गटाचे आणखी दोन जण होते. परवा दिवशी नांदेडमध्ये असताना सर्किट हाऊसवर दोनजण ओरडत होते. त्यातील एक जणाचा शरद पवारांसोबतचा आताचा फोटो आहे. काल जे झालं. त्यात एक शिवसेनेचा जिल्हा प्रमुखच होता असं राज ठाकरे म्हणाले.या सर्व गोष्टींशी, लोकसभेचा निर्णय लागला. यांना वाटलं मराठवाड्यात मतदान झालं. पवार आणि उद्धव ठाकरे यांनी समजावून घेतलं पाहिजे की, ते मतदान मोदी आणि शाह यांच्या विरोधातील होतं. त्यांच्या प्रेमाखातरचं मतदान नव्हतं. मी नेहमी सांगत आलो. विरोधी पक्ष कधी जिंकत नसतो. सत्ताधारी हरत असतो. त्यांना अँटी व्होट मिळाली असं राज ठाकरे म्हणाले. मुस्लिम आणि दलितांनी देशभर मोदी विरोधात मतदान केलं. संविधान बदलणार हे भाजपचाच माणूस बोलला होता ना. इतर कुणी नरेटिव्ह केलेले नव्हते. पण लोकं भडकले होते. त्यांनी मतदान केलं. पण ठाकरे-पवारांना वाटतं त्यांच्या प्रेमाखातर मतदान झालं. पण त्यांच्या प्रेमाखातर मतदान झालं नाही. त्यांना वाटतं विधानसभेला अशीच खेळी खेळावी असं राज ठाकरे म्हणाले.

## 'घालीन लोटांगन वंदिन चरण', ठाण्यातील सभेआधी उद्धव ठाकरेंना डिवचलं, रस्त्यांवर लावले बॅनर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०ठाणे**

राज्यात काही दिवसातच विधानसभा निवडणुका होणार आहेत, या पार्श्वभूमीवर सर्वपक्षांनी जोरदार तयारी केली असून ठाकरे गटानेही दौरे वाढवलेत. आज ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे ठाणे दौऱ्यावर येणार आहेत. राम गणेश गडकरी रंगायतन येथे शिवसेनेच्या भगवा सप्ताहानिमित्त ते येणार आहेत. विधानसभा निवडणुकीत ठाणे पुन्हा ताब्यात घेण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी तयारी सुरू केल्याचे




बोलले जात आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्याआधी ठाण्यात बॅनरबाजी सुरू असल्याचे दिसत आहे. या बॅनरवरुन ठाकरे यांना डिवचले असून बॅनरवर कुणाचेही नाव नाही.

एकीकडे काल उद्धव ठाकरे गटाकडून कोणी पक्ष चोरला असे बॅनर लावले होते, तर दुसरीकडे आज ठाण्यामध्ये उद्धव ठाकरे यांचे 'घालीन लोटांगण' या आशयाचे बॅनर लावले आहेत. या बॅनरवर कुणाचेही नाव नाही. यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. विशेष म्हणजे हे दोन्ही बॅनर एकाच रस्त्यावर आणि समांतर रेषेत आहेत, यामुळे लोकांच्या नजरा दोन्हा बॅनरवर पडतात.

## विनेश प्रमाणे अमन सेहरावतचंही वाढलं होतं वजन १० तासांत ४.६ घस वजन कमी करून जिंकलं ब्राँझ मेडल

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १० पॅरिस**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगाटचा मुद्दा चांगलाच गाजतो आहे. अंतिम लढतीआधी वजन वाढल्यामुळे तिची सुवर्ण पदकाची संधी हुकली. तिला रौप्य पदक मिळणार का? याकडे नजरा लागून राहिल्या असताना युवा पैलवान अमन सेहरावत याने कुस्तीच्या आखाड्यातून



भारताला पॅरिस ऑलिम्पिकमधील पहिलं पदक मिळवून दिले. विनेश फोगाटप्रमाणेच हा पैलवान देखील गोत्यात आला असता. कारण उंपात्य लढतीतील पराभवानंतर त्याचेही वजन वाढले होते. पण हार न मानता काही तासांत ४ किलो पेक्षा अधिक वजन कमी करून तो मॅटवर उतरला आणि त्यानं मैदानही मारलं.

अमन सेहरावत याने फ्री स्टाईल कुस्ती प्रकारातील ५७ किलो वजनी गटात कांस्य पदक पटकावले. उपांत्य फेरीतील पराभवानंतर कांस्य पदकावरील दावा भक्कम करणं एक वेगळे आव्हान असते. त्यात अमन समोर ओव्हरवेटचही चॅलेंज होते. उपांत्य फेरीतील पराभवानंतर या भारतीय पैलवानाचे वजन जवळपास ४.६ किलोनं वाढलं होते. कांस्य पदकाच्या लढतीआधी त्याने कमी करून दाखवतं, जगातील मानाच्या स्पर्धेत भारतीय कुस्तीची मान उंचावण्याचे काम केले.

Vidarbha Youth Welfare Society's
Prof. Ram Meghe Institute of Technology & Research
(An Autonomous Institute)
Badnera-Amravati
Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati
Visit us at: mitra.ac.in
DTE Code : 1105
:: COURSES OFFERED ::

B.Tech
U.G. Engineering Program
Civil Engineering - Choice Code 110519110
Electronics & Telecommunication Engineering - Choice Code 110537210
Mechanical Engineering - Choice Code 110561210
Computer Science & Engineering - Choice Code 110524210
Information Technology - Choice Code 110524610
Artificial Intelligence & Data Science - Choice Code 110526310
Computer Science & Engineering (IoT) - Choice Code 110526710

M.Tech
P.G. Engineering Program
Environmental Engineering- Choice Code 110520110
Structural Engineering- Choice Code 110521210
Computer Science & Engineering - Choice Code 110524210
CAD/CAM - Choice Code 110560410
Thermal Engineering - Choice Code 110561010
Information Technology - Choice Code 110524610
Electronics And Telecommunication Engineering - Choice Code 110537210

MBA MCA
Master of Business Administration - Choice Code 110510110
Master in Computer Application - Choice Code 110524110

641 Offers received through campus drive in 2023 - 2024
3216 Students placed through campus drive in last Five years
20LPA Highest Package Offered
4.8LPA Average Package Offered

41 YEARS OF TRUST & BELIEF
A+ NAAC

NEXT STOP TO THE TOP
PRMIT&R - A place where GOOD becomes the BEST

Highlights
- 24 different Courses (UG, PG & Ph.D.)
- 3817 Students with 1361 Girls
- 3108 Students placed in last five years
- 219 Faculty members with 64 Ph.D.
- 291 Students with distinction
- 283 University-Colour holders

## संपादकीय ......

# ऊर्जेची मागणी वाढली; पण...

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामुळे आणि शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत आहे. उन्हाळ्यात वाढलेले तापमानही याला कारणीभूत ठरले आहे. अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या इंडिया एनर्जी अँड क्लायमेट सेंटरने एका अभ्यासात म्हटले आहे की, मे २०२४ मध्ये भारतातील विजेची मागणी २५० गिगावॅटवर पोहोचली होती. अवघ्या दोन वर्षांत विजेच्या मागणीमध्ये ४६ गिगावॅटची वाढ झाली आहे. २०२७ पर्यंत ही मागणी आणखी ५० ते ८० गिगावॅटनी वाढू शकते. हा अभ्यास सुचवितो की, वाढत्या मागणीचा दबाव सौर आणि इतर स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवून कमी केला जाऊ शकतो.

सन २०२७ पर्यंत देशातील ऊर्जा क्षमतेत १०० गिगावॅट स्वच्छ ऊर्जा, २८ गिगावॅट औष्णिक ऊर्जा आणि १३ गिगावॅट जलविद्युत ऊर्जा अतिरिक्त तयार करण्याची योजना आहे. हा संकल्प पूर्ण होऊन विजेच्या उत्पादनात वाढ झाली तरी सायंकाळी आणि रात्रीच्या वीजपुरवठ्यात आठ ते बारा टक्के तुटवडा जाणवणार आहे. त्यामुळे ऊर्जानिर्मिती आणखी वाढवण्यासाठी प्रयत्न तीव्र करण्याची गरज आहे. भारताने गेल्या काही वर्षांत स्वच्छ ऊर्जेचे उत्पादन आणि वापरामध्ये उत्साहवर्धक कामगिरी दाखवली आहे. इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासोबतच सौरऊर्जा पॅनेल बसवण्यासाठी प्रोत्साहन योजनाही राबवल्या जात आहेत.

अलीकडे अर्थसंकल्पात या संदर्भातील तरतूद वाढवण्यात आली असून, आयात शुल्कातही सवलत देण्यात आली आहे. या प्रयत्नांमुळे हरित ऊर्जा वाढेल; पण वाढती मागणी लक्षात घेता ती पुरेशी आहे असे म्हणता येणार नाही. आजही मोठ्या शहरांमध्ये उन्हाळ्यात वीज खंडित होण्याचे प्रकार सर्रास घडतात. लहान शहरे आणि शहरांमध्ये नियमितपणाने भारनियमन सुरू आहे. अनेक ठिकाणी जनरेटर वापरले जातात, जे प्रदूषणाचे कारण बनतात. सौर आणि इतर ऊर्जेच्या साठवणुकीचा खर्च अत्यंत कमी करण्यात आला आहे, ही एक महत्त्वाची कामगिरी आहे. हा स्तर नवीन औष्णिक प्रकल्प उभारण्याच्या खर्चापेक्षा कमी आहे.

आजघडीला जागतिक स्तरावरही असाच ट्रेंड आहे, ज्यामध्ये खर्च कमी होत आहे आणि उत्पादन वाढत आहे. भारताने या परिस्थितीचा फायदा घेतला पाहिजे. २०४७ मध्ये विजेची मागणी चार पटीने वाढणार आहे. त्या वर्षी आपण आपल्या स्वातंत्र्याचा शंभरावा वर्धापन दिन साजरा करू आणि विकसित भारताची प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी आपल्या कामगिरीचा आढावा घेऊ. विकासाचा वेग वाढवण्यासाठी आणि लोकसंख्येच्या मोठ्या वर्गाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी ऊर्जेची उपलब्धता वाढवणे आवश्यक आहे. हवामान बदल, पर्यावरण संरक्षण आणि प्रदूषण नियंत्रण या आव्हानांना तोंड देण्यासाठी स्वच्छ ऊर्जेचा विकासही आवश्यक आहे.ऊर्जा क्षेत्रात भारत हा जगातील तिसरा मोठा ग्राहक आहे. लिक्विड नॅचरल गॅसचा चौथा मोठा निर्यातदार देश आहे.

देशात प्राथमिक पातळीवर ऊर्जेची मागणी २०५० पर्यंत दुप्पट होईल. देशात गेल्या पाच वर्षांत शाश्वत ऊर्जेचे उत्पादन १६२ टक्क्यांनी वाढले आहे. आपण ऊर्जेची गरज भागवताना १५८.१२ गिगावॉटचा (सुमारे ४० टक्के) वाटा हा नव्या ऊर्जा स्रोतांचा आहे. २०३५ पर्यंत त्यास ४५० गिगावॉट पातळीपर्यंत नेण्याचा प्रयत्न आहे. अशावेळी सौरऊर्जेसह आपल्याला ग्रीन हायड्रोजन, इथेनॉल आणि कचर्यांपासून ऊर्जा तयार होणार्या प्रकल्पांत अधिक गुंतवणूक करावी लागेल. वाढते प्रदूषण लक्षात घेता भविष्यात सौरऊर्जेसारख्या पर्यायाचा प्रामुख्याने विचार करावे लागेल. लोकांना त्याबाबत जागृत करून त्यांना सौरऊर्जेचा वापर करण्यास प्रवृत्त करायला हवे. अर्थात, सौरऊर्जा, ग्रीन हायड्रोजन, इथेनॉल वापरण्याबाबत सरकारने अनेक योजना आखल्या आहेत. त्यांचा वापरही होताना दिसत आहे; पण त्यांचा व्यापक प्रमाण वापर करण्यासाठी लोकांनी पुढाकार घ्यायला हवा. प्रदूषण रोखायचे असेल, तर विचार करायलाच हवा.

# खतांवरील खर्च कमी करण्यासाठी विद्राव्य खतांचा वापर केव्हा व कसा करावा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

विद्राव्य खते ही पाण्यात पुर्णपणे विरघळणारी असतात. त्यामुळे ही खते पिकांना फवारणीद्वारे किंवा ठिबकद्वारे देणे संयुक्तिक आहे. ही खते पिकांना लवकर उपलब्ध होतात. ही खते पिकांच्या वाढीच्या अवस्थेत देण्याकरीता अधिक फायदेशीर आहेत.

विद्राव्य खते फवारणीद्वारे देत असताना स्टीकर्स वापरणे फायद्याचे असते. बाजारामध्ये वेगवेगळी खतांची ग्रेड उपलब्ध आहेत. त्या- त्या अवस्थेमध्ये ती ग्रेड फवारल्यास उत्पादनामध्ये वाढ दिसून येते. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार वेगवेगळी खतांच्या ग्रेडची निवड करून त्यांची पिकांवर फवारणी करावी.




### विद्राव्य खतांचे महत्व

- विद्राव्य खते ही मातीतून दिल्या जाणाऱ्या रासायनिक खतांच्या तुलनेत पिकांना लवकर उपलब्ध होतात.

- रासायनिक खते जमिनीतून देण्यासाठी उशीर झाला असल्यास, ही खते फवारणीद्वारे देता येतात.

- पिकांचे उत्पादन आणि रासायनिक खताचा शास्त्रोक्त वापर यात सांगड घालणे सोपे जाते.

- विद्राव्य खते विभागून देता येतात.

- पिकांच्या मुळांच्या कार्यकक्षेतून निचरून किंवा वायु रूपात वाया जाण्याची शक्यता कमी असते, त्यामुळे विद्राव्य खतांची कार्यक्षमता ही ७० ते ८० टक्के राहते.

- विद्राव्य खतांची कार्यक्षमता ही जमिनीचे गुणधर्म, पाण्याची गुणवत्ता, खताची क्षारता, खते देण्याचा कालावधी आणि खते देण्याची साधने यावर अवलंबून असते.

विद्राव्य खतांचा वापर केव्हा करावा

- जास्त पाण्यामुळे किंवा पाण्याच्या ताणामुळे पिकांना अन्नद्रवे मिळत नसल्यास.

- पीक अन्नद्रव्याची कमतरता दर्शवित असल्यास.

- मातीतून दिल्या जाणाऱ्या खतांची कार्यक्षमता खूप कमी असल्यास.

- सिंचनाची आणि सिंचन संचाची उपलब्धता असल्यास.

- फवारणी करण्याकरीता असलेल्या सुविधा उपलब्ध असल्यास.

### खत किती द्यावे?

- विद्राव्य खतांचा वापर करीत असतांना आणि त्यांची मात्रा काढत असताना, माती परीक्षण हा महत्वाचा मुद्दा आहे.

- खत मात्रा ठरविण्यासाठी मातीची गुणधर्मेही माहित असणे आवश्यक आहे, अन्यथा खतांवरील खर्च वाढण्याची शक्यता असते.

- माती परीक्षण अहवालातील सहा स्तरीय वर्गीकरणानुसार अथवा विविध पिकांकरीता विकसीत केलेल्या गुणसुत्रांनुसार आणि सिंचनाच्या पाळ्या नुसार मात्रा ठरवावी.

- सहसा विद्राव्य खतांचा वापर करीत असतांना ३-४ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात विविध ग्रेड चा वापर केल्या जातो, काही वेळा ७-८ ग्रॅम प्रति लिटर खत वापर सांगितल्या गेला आहे. म्हणजेच १० लिटर च्या टाकी साठी ७०-१०० ग्रॅम खत वापरणे गरजेचे आहे.

# पाच टक्क्याचा निंबोळी अर्क घरच्या घरी कसा बनवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती-** निंबोळी अर्क म्हणजे कडुलिंब या झाडाच्या बियांपासून (निंबोळ्या) काढलेला अर्क होय. कडुलिंबाच्या झाडाला फेब्रुवारी ते मार्च महिन्यांत मोहोर येतो आणि मे महिन्याच्या शेवटी निंबोळ्या पक्व होऊन त्यांचा सडा झाडाखाली पडतो.

या निंबोळ्या गोळा करून त्यातील दगड-धोंडे आणि खडे वेगळे करून पोत्यामध्ये वर्षभर साठविता येतात. साठविलेल्या निंबोळीपासून वर्षभरात गरजेप्रमाणे निंबोळीचा अर्क तयार करण्यासाठी, तसेच निंबोळी पेंड तयार करण्यासाठी वापर करता येतो.कडुलिंबाच्या झाडामध्ये असलेले 'अॅझाडिराक्टीन' कीटकनाशकाचे काम करते. या घटकाचे प्रमाण याच्या बियांमध्ये जास्त प्रमाणात असते, तर ते पानांमध्ये कमी प्रमाणात असते. शेतीमध्ये निंबोळी ला खुप महत्व आहे. निंबोळी चा किटकनाशक बणविण्यासाठी उपयोग होतो. निंबोळीत असणारा अझाडीरेक्टीन हा घटक किटक, सुत्रकृमी विषाणु आणि बुरशी यांचे नियंत्रण करण्यासाठी उपयोग होतो. फक्त चाऊन खाणारे व रस शोषणाऱ्या किडींवर परिणाम करते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**निंबोळी अर्क वापरण्याचे फायदे**

१) संपूर्णपणे नैसर्गिक स्रोतांपासुन तयार होत असल्यामुळे खर्च अतिशय कमी येतो.

२) निंबोळी अर्काच्या फवारणीमुळे रसशोषक किडींचा प्रादुर्भाव कमी होतो. सर्व प्रकारच्या पिकांवर १५ दिवसांच्या अंतराने नियमीत फ़वारणी घेतल्यास, रस शोषक किडींच्या जीवनचक्रात अडथळा येऊन किडींचे नियंत्रण होते.




३) किडींच्या जीवनचक्रामध्ये पतंगवर्गीय किडींना अंडी घालण्यापासुन परावृत्त केले जाते तसेच रसशोषक किडींचेदेखील अंडी घालण्याच्या नैसर्गिक क्रियेमध्ये अडथळा येतो. त्यामुळे एकूणच जीवनचक्रामध्ये अडथळा येतो.

४) नैसर्गिक घटक असल्या कारणाने कोणत्याही प्रकारचे रासायनिक अंश राहत नाही. यामुळे सेंद्रिय शेतीमध्ये वापर करण्यास सुलभ आहे. निर्यातीसाठीच्या भाजीपाला पिकामध्येदेखील याची फवारणी फायदेशीर ठरते.

५) कीटकनाशकांसोबतदेखील वापरता येत असल्या कारणाने तसेच एकात्मिक कीड नियंत्रण पध्दतीमध्ये वापरण्यास अगदी सोपे असे हे नैसर्गिक कीडनाशक आहे.

६) पांढरी माशी, मावा, फुलकिडे, विविध प्रकारच्या अळ्यांचे देखील नियंत्रण चांगल्या प्रकारे होते. मोठ्या अळ्यांचे नियंत्रणात निंबोळी अर्काची जास्त मदत होत नाही यासाठी अळी लहान अवस्थेत असतानाच निंबोळी अर्काची फवारणी करावी.

७) निंबोळी अर्क कीटकांवर बहुआयामी आंतरप्रवाही किटकनाशकाप्रमाणे कार्य करतात.

हे महत्वाचे

१) मे ते जुन महिन्यात झाडावरून पिकलेल्या निंबोळ्या गोळा करा आणि सावलीत वाळवा.

२) आठ महिन्यांपेक्षा जुन्या निंबोळ्या वापरू नका कारण इतक्या जुन्या बियांमध्ये जरूर ती कीडनाशक शक्ती राहात नाही.


३) नेहमी निंबोण्यांचा ताजा अर्क (छडघए) वापरा.

४) योग्य परिणाम मिळण्यासाठी दुपारी ३.३० नंतर तो फवारा.




# थायरॉईडमुळे वजन वाढल्यास करा हे उपाय...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती-** थायरॉईड ग्रंथी शरीरातील चयापचय क्रिया नियंत्रित करण्याचे काम करते. त्यामुळेच थायरॉईड ग्रंथींचे काम योग्य प्रकारे होत नसेल तर आरोग्याच्या अनेक तक्रारी भेडसावतात. थायरॉईड ग्रंथीचे असंतुलन दोन प्रकारचे असते. थायरॉईडच्या रुणांची संख्या वेगाने वाढते आहे. सर्वसाधारणपणे महिलांमध्ये हा विकार जास्त वेगाने वाढताना दिसतो आहे.



पहिल्या अवस्थेत थायरॉईड ग्रंथींमधून कमी प्रमाणात संप्रेरके स्रवतात त्याला हायपोथायरॉईडिझम म्हणतात तर दुसऱ्या अवस्थेत थायरॉईड ग्रंथींमधून अधिक प्रमाणात संप्रेरके स्रवतात. त्याला हायपोथायरॉइडिझम म्हणतात. थायरॉईड विकारामुळे जर वजन वाढत असेल तर आपल्याला हायपोथायरॉइडिझम आहे.

वजन वाढणे थांबवण्यासाठी जीवनशैलीतील काही सवयी बदलाव्या लागतील. सर्वप्रथम तपासणी करा वजन वाढणे हे काही फक्त थायरॉईडचे लक्षण असते असे नाही. त्यामुळे थायरॉईडची तपासणी करून घ्यावी. त्यामधून थायरॉईड असल्यास त्याचा कोणता प्रकार आहे ते समजून घेता येईल. अंडर अॅक्टिव्ह थायरॉईड की ओव्हर अॅक्टिव्ह थायरॉईड यापैकी कोणता आहे हे समजून घेता येईल.

या तपासणीच्या निष्कर्षानंतरच पुढे काही मार्ग आखता येईल. इतरही काही गरजेच्या तपासण्या करून डॉक्टर वजन नियंत्रित ठेवण्यासाठी कशा प्रकारची जीवनशैली अंगीकारावी याविषयी मार्गदर्शन करू शकतील तसेच उपचारांची दिशा देखील ठरवता येईल. थायरॉईडमध्ये वजन कमी करण्यासाठी शरीराला योग्य पोषण मिळण्याबरोबरच आहाराच्या काही सवयी जरूर बदलाव्या लागतील.

नियमित व्यायामाबरोबर आपल्या आहारात थोडी कपात करून त्याऐवजी उकडलेल्या भाज्या, सलाड यांचे सेवन करावे. त्यामुळे थायरॉईड असले तरीही वजन वेगाने कमी होण्यास मदत होईल. त्याशिवाय मीठाचा वापर कमी करायला हवा. वजन कमी करण्यासाठी अनेक जण ग्रीन टी चा वापर करतात. शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यासाठी त्याची मदत होते. त्यामुळे वजन कमी होण्याची प्रक्रियाही वेगाने होते. पण थायरॉईडच्या विकारात ग्रीनटीचे सेवन हानीकारक ठरू शकते. त्यामुळे याबाबत वैद्यकीय सल्ला जरूर घ्यावा.

थायरॉईड विकारामध्ये स्थूलता वाढण्याचे मोठे कारण म्हणजे औषधांमधील अनियमितता. त्यामुळे थायरॉईड असेल तर गोळ्या घेण्याची एक वेळ ठरवा आणि त्याच वेळेला औषधे घ्यावीत. मुख्य म्हणजे गोळी घेणे विसरता कामा नये. थायरॉईडच्या विकारात आहारात उकडलेला बटाटा, रताळे यांचे सेवन आपण करू शकतो.

याच्या सेवनाने शरीराला कोलेस्ट्रॉल कमी मिळते पण पोटॅशिअम भरपूर प्रमाणात मिळते जे थायरॉईड विकारात आवश्यक असते. या दरम्यान पांढरा तांदुळ खाण्याऐवजी ब्राऊन राईसचे सेवन करावे. त्याशिवाय तंतुमय घटकांसाठी मोडाची कडधान्ये, डाळी सेवन कराव्यात. बी जीवनसत्त्वासाठी दही, दूध, फळाचे रस तसेच सुकामेवा सेवन करू शकतो. कॅफीन युक्त पदार्थ, ग्लुटेन युक्त आहार, फास्टफूड तसेच गोड पदार्थांचे सेवन करू नये.

# जिल्ह्यातील ९ आपले सरकार केंद्रांना जिल्हा प्रशासनाने अखेर ठोकले कुलूप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती** - अतिरिक्त पैशांची मागणी, अनियमित कामांमुळे तसेच नागरिकांकडून मिळालेल्या तक्रारीनंतर जिल्हा प्रशासनाने ९ आपले सरकार केंद्रांविरोधात कारवाई करत कुलूप ठोकले आहे. यात धारणी उपविभागातील ४, अमरावती व अचलपूर विभागातील प्रत्येकी दोन आणि चिखलदरा विभागातील एका केंद्राचा समावेश आहे.आपले सरकार केंद्रांनी कोणते दाखले, प्रमाणपत्र व दस्तावेज तयार करण्यासाठी किती शुल्क आकारावे यासाठी शासनाने दर ठरवून दिले आहेत. सेवेचे दरपत्रक आपलेसरकार केंद्राच्या दर्शनी भागात लावण्याचे निर्देश उपविभागीय अधिकाऱ्यांद्वारे वेळोवेळी जारी केले जात असतात. परंतु, त्यानंतरही आपले सरकार केंद्र संचालकांद्वारे निर्धारित शुल्कापेक्षा जास्त रक्कम कोणत्याही कारणाने नागरिकांकडून जास्त आकारली जात असेल किंवासेवा देण्यात उशीर केला जात असेल तर त्यांच्याविरोधात कारवाई केली जाते. जिल्ह्यात नागरिकांद्वारे जिल्हा प्रशासनाकडे तक्रार केल्यानंतर जिल्हा प्रशासनाने ९ आपले सरकार केंद्र बंद करण्याचे आदेश दिले आहेत. आपले सरकार केंद्रावर नियंत्रणासोबतच तांत्रिक सल्ला देण्याची जबाबदारी ही जिल्हाधिकारी - कार्यालयातील महाआयटी - विभागाची आहे. परंतु, जिल्ह्यातील - बहुतांश आपले सरकार केंद्रांवर - दाखल्यांसाठी आकारल्या जाणाऱ्या - निश्चित शुल्कांचे दरपत्रकच नसते. याकडे जिल्हा महाआयटी विभागाचे लक्ष नसल्याचेही नागरिकांचे मत आहे.

आपले सरकार
आपले सरकार सेवा
डिजिटल सेवा
कॉमन सर्विस सेंटर

# सर्व राजकीय पक्षांनी बांगलादेशमधील हिंदू, बौद्ध बांधवांच्या पाठीशी उभे रहावे ;आरएसएस ची भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० नागपूर :** बांगलादेशमधील अस्थिर राजकीय स्थिती व अराजकतेच्या वातावरणात हिंदू, बौद्ध व अल्पसंख्यांकांवर अत्याचार होत आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे देशातील सर्व राजकीय पक्षांना एकजूट दाखविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तेथील हिंदू, बौद्ध व इतर अल्पसंख्यांकांच्या पाठीशी भारतातील सर्व राजकीय पक्षांनी उभे राहिले पाहिजे, असे प्रतिपादन संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले आहे.

बांगलादेशात सत्ता परिवर्तनाच्या आंदोलनादरम्यान परिस्थितीत हाताबाहेर गेली व हिंदू, बौद्ध व इतर अल्पसंख्यांक समाजासोबत हिंसा सुरू झाली. ही गंभीर बाब आहे. तेथील लोकांचे हत्याकांड, आग, लुटपाट, महिलांवरील अत्याचार, मंदिर व इतर प्रार्थनास्थळांवरील हल्ले सहन करण्याजोगे नाहीत. बांगलादेशमधील नवनियुक्त सरकार अशा घटनांवर नियंत्रण आणेल व तेथील अल्पसंख्यांकांच्या प्राण व मालमत्तेचे रक्षण करेल अशी अपेक्षा आहे. या परिस्थितीत जगातील विविध समुदाय व भारतातील राजकीय पक्षांनी एकत्रित येत पिडित लोकांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. बांगलादेश आपला शेजारी देश आहे. त्यामुळे केंद्र सरकारनेदेखील तेथील अल्पसंख्यांकांच्या सुरक्षेसाठी हरतऱ्हेने प्रयत्न केले पाहिजे, असे होसबळे म्हणाले.




RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १० ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण


# छत्रपती संभाजीनगरमध्ये आ.बच्चू कडूंचा विराट मोर्चा

## ५ सप्टेंबर पर्यत मागण्या मान्य न झाल्यास २२ सप्टेंबर ला मुंबईत धडक देणार





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० छत्रपती संभाजी नगर** – प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ऑगस्ट क्रांती दिनी छत्रपती संभाजीनगरमध्ये काढण्यात आलेल्या विराट 'आक्रोश मोर्चा' च्या माध्यमातून राज्यातील शेतकरी, दिव्यांग, प्रकल्पग्रस्त, कामगार इत्यादींच्या विविध मागण्या त्यांनी सरकारपुढे मांडल्या आहेत. ऐनवेळी एक दिवसापूर्वीच या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती, मात्र पोलिसांच्या आदेशाला न जुमानता आक्रमक झालेल्या आ. कडू यांनी क्रांती चौक ते दिल्ली गेट येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर विराट मोर्चा काढून जोरदार शक्तिप्रदर्शन केले आहे. आ. कडू यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन राज्याच्या विविध भागातून एक लाखांहून अधिक दिव्यांग, शेतकरी, कामगार इत्यादि लोक या मोर्चामध्ये सहभागी झाले होते. राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक होत आ. कडू यांनी सरकारने स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, शेतकरी कर्जमाफी तसेच दोन वर्षातील कर्जाच्या व्याज आणि मुद्दलावर ५० टक्के सवलत मिळावी, स्वतंत्र कांदा निर्यातबंदी धोरण बनवावे, फलोत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज द्यावे, शेतमजुरांसाठी स्वतंत्र योजना सुरू करावी इत्यादी मागण्या केल्या आहेत. राज्यात स्वतंत्र दिव्यांग विभाग असतानाही दिव्यांगांना दिव्यांगांना मिळणाऱ्या मासिक वेतनात वाढ करावी, त्यांच्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करावे, प्रकल्पग्रस्तांसाठी स्वतंत्र महामंडळ सुरू करावे, शहरी व ग्रामीण घरकुल योजनांमधील निधीत समानता आणावी, बेघरांना घरे द्यावीत, अर्धवेळ शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करावी, मुंबईतील राज्यपाल बंगल्याचा लिलाव करून तो पैसा योजनांसाठी वापरात आणावा, मुंबईतील पारशी व्यापाऱ्यांनी हडपलेली जमीन शासनजमा करावी, इत्यादि १७ प्रकारच्या विविध मागण्यांसाठी विभागीय आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन आयुक्तांना देण्यात आले.आ. बच्चू कडू यांनी सरकारमध्येच असतानाही मोर्चाच्या माध्यमातून जोरदार शक्तिप्रदर्शन करत आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरकारला मोठा इशारा दिला आहे. मोर्चात करण्यात आलेल्या मागण्या जर सरकारने तात्काळ मान्य करून त्याबाबत त्वरित शासननिर्णय काढला, तर आगामी विधानसभा निवडणुकांत स्वतंत्रपणे लढण्या बाबत आपण दोन पावले मागे घेऊन महायुतीला पाठिंबा देऊ असे त्यांनी सांगितले आहे. सरकार जर या मागण्यांचा विचार करणार नसेल तर शेतकरी, दिव्यांग, शेतमजूर, कामगार, इत्यादींना सोबत घेऊन निवडणुकांना सामोरे जाण्याबाबत आपण विचार करू असा इशाराही बच्चू कडू यांनी महायुतीला दिला आहे.यावेळी प्रहारचे आमदार राजकुमार पटेल, कार्याध्यक्ष बल्लु जवंजाळ, प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे दिव्यांग संघटना अध्यक्ष रामदास खोत ई. पदाधिकारी उपस्थित होते.

# एका मिनिटात विमान १७ हजार फूट खाली कोसळले

## ६२ प्रवाश्यांचा मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० साओ पाउलो**

ब्राझीलच्या साओ पाउलो राज्यात शुक्रवारी ९ ऑगस्ट रोजी झालेल्या विमान अपघातात विमानातील ६२ लोकांचा मृत्यूची भीती व्यक्त करण्यात आली आहे. व्हायरल व्हिडिओंमध्ये अपघातग्रस्त विमान लोकवस्तीजवळ झाडांमध्ये कोसळताना दिसत आहे. यादरम्यान एका कार्यक्रमात उपस्थित असलेले ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुला दा सिल्वा यांनी या दुःखद घटनेविषयी बातमी दिली. त्यांना उपस्थितांना याबद्दल एक मिनिट मौन पाळण्यास सांगितले. अपघाताचे कारण कळू शकलेले नाही, असेही त्यांनी सांगितले.

६२ जणांना घेऊन जाणारे विमान शुक्रवारी ब्राझीलमधील लोकवस्तीजवळ क्रॅश झाले. यात विमानातील कोणीही वाचले नाही. ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुला दा सिल्वा म्हणाले, मला ही वाईट बातमी सांगताना खूप दुःख होत आहे. या भीषण अपघातात विमानातील सर्वांचा मृत्यू झाला आहे.

एका सोशल मीडिया पोस्टमधून साओ पाउलो राज्यातील एक प्रादेशिक एअरलाइन वोपास ने फ्लाइट २२८३ क्रॅश झाल्याची पुष्टी केली आहे. त्यात म्हटले आहे की विमानात ५७ प्रवासी आणि इतर क्रू मेंबर्स होते. सर्वजण ब्राझीलचे होते. यातील कोणीही वाचलेले नाही.

या दुर्घटनाग्रस्त विमानाने पॅराग्वे आणि अर्जेंटिनाच्या दक्षिणेकडील सीमेजवळील ब्राझीलमधील शहर कॅस्कावेल येथून उड्डाण केले होते. ते ग्वारुलहोस येथील साओ पाउलोच्या मुख्य आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दिशेने चालले होते. या दरम्यान ते दुर्घटनाग्रस्त झाल्याचे वोपस एअरलाइनने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# नेरपिंगळाई मधील नागरिकांचे आरोग्य आले धोक्यात

## ग्रा. पं.च्या नियोजनशून्यतेने अन् सर्वत्र दुर्गंधी पसरल्याने नागरिक त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० नेरपिंगळाई**

मोर्शी तालुक्यातील सर्वात मोठे गाव असूनही ग्रामपंचायतीच्या नियोजनशून्य कारभारामुळे नेरपिंगळाई समस्यांचे माहेरघर बनले आहे. आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा, पथदिवे यासारख्या समस्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. गावाला विविध समस्यांचा विळखा पडला असून, सर्वत्र दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. याबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

पावसाळा लागण्यापूर्वी गावातील नाले व गटारे साफ करण्याचे नियोजन ग्रामपंचायतीने करणे आवश्यक होते. परंतु, ग्रामपंचायतीने नियोजन न केल्यामुळे पावसाळ्यात गटारे आणि नाल्या तुंबत आहेत. त्यामुळे गावात साथरोगाचे प्रमाण वाढले आहे. गावातील नाल्या साफसफाईकरिता केवळ बोटावर मोजण्याइतपत कर्मचारी असल्याने गावातील नाल्या आणि गटारे अर्धा पावसाळा उलटूनही स्वच्छ झालेल्या नाहीत. याचा परिणाम गावातील स्वच्छतेसह नागरिकांच्या आरोग्यावर झालेला आहे. ज्या नाल्या ग्रा.पं.च्या कर्मचाऱ्यांनी उपसल्या होत्या, त्यातील मलबा तसाच नाल्यांच्या काठावर पडून आहे. त्यावर आता गवत आणि वेली उगवत आहे. नाल्यांमधील कचरा गावाबाहेर न नेल्यामुळे तो पुन्हा नालीमध्ये पडून नाल्या तुंबत आहेत. त्यामुळे गावात सर्वत्र दुर्गंधी पसरली असून, रोगराईचे प्रमाण वाढत आहे.

शासनाच्या निधीमधून लावण्यात आलेले जलशुद्धीकरण यंत्र अनेक दिवसांपासून बंद आहे. ते सुरू केल्यानंतर मोजके काही दिवस त्याचा लाभ नागरिकांना घेता आला. त्यानंतर मात्र अनेक महिन्यांपासून हे यंत्र बंद स्थितीत आहे. त्यामुळे जलशुद्धीकरणासाठी खर्ची झालेला लाखो रुपयांचा निधी व्यर्थ गेल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

गावात वित्त आयोगातून मंजूर झालेली अनेक कामे अजूनही सुरू झाली नाहीत. जी कामे सुरू झाली ती सुद्धा संथगतीने होत आहेत. काही ठिकाणी खोदकाम करून ठेवले आहे. कामे संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांना त्रास होत आहे. त्याचा परिणाम गावातील विकास, आरोग्य व स्वच्छता यावर होताना दिसत आहे.

### तो निधी कुठे खर्च केला

: गावाच्या मध्यवस्तीत शेणाचे उकिरडे असून कीटक, सरपटणारे प्राणी यांचा वावर असल्याने नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. गावात संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने गावातील खासगी दवाखाने हाऊसफुल्ल झालेले आहेत. नाली साफसफाई आणि स्वच्छतेसाठी आलेला निधी नेमका कुठे खर्च केला, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित करण्यात आला आहे.






### ग्रामसचिवाच्या खांद्यावर चार गावांची धुरा

समस्या निवारणासाठी लवकरच करू प्रयत्न गावातील समस्या निराकरणासाठी लवकरच प्रयत्न केले जाणार आहेत. आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध व्हावा, याकरिता वरिष्ठांना निवेदन दिले आहे. .–**विनोद मनवर,** ग्रामसचिव, नेर पिंगळाई

### अंधारामुळे घडू शकते अनुचित घटना

: गावातील अनेक वॉर्डांमधील आणि मुख्य रस्त्यावरील पथदिवे अनेक दिवसांपासून बंद आहेत. नागरिकांनी वारंवार मागणी करून व सूचना देऊन सुद्धा पथदिवे लावण्यात आलेले नाही. त्यामुळे अनेक वॉर्डांमध्ये अंधाराचे साम्राज्य आहे. सद्य:स्थितीत पावसाळा असून जमिनीवरील सरपटणारे प्राणी यांचे प्रमाण वाढले असून अंधारामुळे अनुचित घटना घडू शकते. जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेल्या ग्रामीण आरोग्य केंद्रात मागील काही महिन्यांपासून वैद्यकीय अधिकारी नाही. एका वैद्यकीय अधिकाऱ्याचे पद रिक्त असून तेही भरले नाही. त्यामुळे गावातील आरोग्य व्यवस्थेवर त्याचा परिणाम होत आहे. गावात कायमस्वरुपी ग्राम सचिव नाही. तालुक्यातील सर्वात मोठ्या असणाऱ्या या ग्रामपंचायतीच्या सचिवाकडे चार गावांचा कारभार दिला असल्याने विकासकामाकडे ग्राम सचिवांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. त्यामुळे नागरिकाच्या समस्या जैसे थे आहेत.

# विद्यार्थ्यांच्या शुल्क परतावा धोरणावर विद्यापीठ उदासीन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–**

विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) द्वारे घोषित केलेल्या शुल्क परतावा धोरणावर लक्ष केंद्रित केले आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची यासंदर्भात उदासीनता दर्शवली असून, विद्यार्थ्यांच्या समस्या संघटनेकडे आल्या आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने शुल्क परतावा धोरणाविरोधात कुलगुरूंना निवेदन देण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२३ पासून यूजीसीने विद्यार्थ्यांना शुल्क परतावा मिळवण्याचा अधिकार दिला. या घोरणानुसार, विद्यापीठांना प्रक्रियात्मक शुल्क म्हणून अधिकतम एक हजार रुपये वगळून इतर सर्व शुल्क परत करणे बंधनकारक आहे. तथापि, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने अद्याप या संदर्भात कोणतीही दिशादर्शक मार्गदर्शिका जारी केली नाही. अभाविपने अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरूंना या संदर्भात निवेदन देऊन विद्यापीठाच्या या कारवाई विरोधात तीव्र रोष व्यक्त केला आहे. दरम्यान विद्यापीठ प्रशासनाने दिवसांमध्ये याबद्दल काही योग्य मार्गदर्शिका येईल, अशी ग्वाही दिली आहे. या वेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विदर्भ प्रांत सहमंत्री संदेश उरकुडे, अमरावती विभाग संघटन मंत्री योगेश शेळके, महानगर मंत्री रिया गुप्ते यांच्यासह अन्य विद्यार्थी उपस्थित होते.



# महापालिकेत ३९ प्रशिक्षणार्थीची नियुक्ती

## युवा कौशल्य प्रशिक्षण योजनेंतर्गत रुजू करणारी राज्यात पहिली मनपा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत १०५ प्रशिक्षणार्थींना कागदपत्र व पडताळणीसाठी महापालिकेत बोलावण्यात आले होते. त्यापैकी ५० लाभार्थी उपस्थित झाले. संमती दर्शवणाऱ्या ३९ प्रशिक्षणार्थी युवक-युवतींना जिल्हाधिकारी तथा प्र. मनपा आयुक्त सौरभ कटियार यांच्या हस्ते नियुक्तिपत्र देण्यात आले. तसेच शुक्रवार, ९ ऑगस्टला या ३९ युवक- युवतींना रुजू करून घेण्यात आले. युवा कौशल्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना रुजू करून घेणारी

अमरावती मनपा ही राज्यात पहिलीच आहे.जिल्हाधिकाऱ्यांनी योजनेची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना दिली. ही त्यांच्यासाठी सुवर्णसंधी असल्याचे त्यांना समजावून सांगितले. या उमेदवारांच्या मुलाखती घेऊन कागदपत्रांची तपासणी करण्यातआली. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना सहा महिन्यासाठी ६ हजार, ८ हजार व १० हजार रुपये राज्य शासनाद्वारे विद्यावेतन देण्यात येणार – आहे. ३९ प्रशिक्षणार्थी युवक-युवती – मनपातील विविध विभागात – सहायक म्हणून सेवा देतील. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण मेळावा मनपा कॉन्फरन्स हॉल येथे आयोजित केला होता. या मेळाव्याला अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर व मनपा कर्मचारी उपस्थित होते. तत्पूर्वी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कार्य निवड झालेले उमेदवार मनपात रुजू झाले आहेत. प्रशिक्षणासाठी नंदकिशोर पवार, शेखर ताकपिठे, विष्णू लांडे, ज्योती पारडशिंगे, अर्चना इंगळे, दिवाकर लकडे यांनी परिश्रम घेतले.

### मनपाच्या विविध विभागात सहायक म्हणून देतील सेवा

मनपा मध्ये प्रशिक्षणासाठी रोहिणी भोरे, प्रिया साहू, धरमवीर युक्नाते, प्रतीक सौदागर, अखिलेश पछेल, हेमंत नागे, ऋषिकेश भडके, प्रणय भडके, अमोल राऊत, करुणावासनिक, अनामिका तायडे, करिश्मा चौरासे, अमृता सोनेकर, अंजली दोडके, पंकज वैद्य यांच्यासह एकूण ३९ प्रशिक्षणार्थींना रुजू आदेश देण्यात आले आहेत.

# ‘घरोघरी तिरंगा मोहिमे’चा मोटरसायकल रॅलीने शुभारंभ

## ‘घरोघरी तिरंगा’ मोहिमेत नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे- निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती,** भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७७ वा वर्धापन दिन १५ ऑगस्ट रोजी उत्साहात साजरा होणार आहे. यावर्षीही ‘हर घर तिरंगा’ मोहिम दि. ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबविण्यात येत आहे. ही मोहिम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी आपल्या घरावर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूर्तने करावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातून काढण्यात आलेल्या मोटार सायकल रॅलीला निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी हिरवी झेंडी दाखवून ’घरोघरी तिरंगा मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी मनपाचे उपायुक्त माधुरी मडावी, जुमा प्यारेलाल, नगरपालिका प्रशासन अधिकारी सुमेध अलोणे, तहसीलदार डॉ. प्रशांत पडघन, अधीक्षक डॉ. निलेश खटके आदी उपस्थित होते.





घरोघरी तिरंगा मोहिम दि. ९ ते १५ ऑगस्टदरम्यान विविध कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत प्रत्येक घरावर दि. १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान राष्ट्रध्वज फडकविण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा फडकवावा आणि राष्ट्रध्वजासोबतचा सेल्फी काढून हरीसहरींळीरपसर.ले या संकेतस्थळावर अपलोड करावा. तसेच मोहिम कालावधीत तिरंगा रॅली, तिरंगा यात्रा, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा कॉन्सर्ट, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फी, तिरंगा ट्रीब्यूट असे विविध उपक्रम राबविले जाणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी व महानगरपालिकाच्या वतीने मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली शहरातील मुख्य मार्गावरुन काढण्यात आली. रॅलीदरम्यान ‘घरोघरी तिरंगा’ लावा, वंदे मातरम, भारत माता की जय, यासह विविध देशभक्तीवर आधारित घोषणा व गीतांनी वातावरण देशभक्तीमय झाले होते.

# धामोरी गावात नागपंचमीला गणपती बाप्पाचा जयघोष

## दीड दिवसाच्या बाप्पाचे विसर्जन

### २०० ते २५० वर्षापूर्वीची गुरुजींनी सुरु केलेली परंपरा गावकऱ्यांनी ठेवली कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०भातकुली–** नागपंचमी ला सर्वत्र नागाची पुजा केली जाते मात्र अमरावती जिल्हातील भातकुली तालुक्यातील धामोरी (कसबा) या गावात नागपंचमीच्या आदल्या दिवशी गणपती बाप्पाचे दीड दिवसाचे आगमन होते.मागील २०० ते २५० वर्षापूर्वीच्या आधीपासून सुरू असलेल्या या परंपरेचे वैशिष्ट काय ? ते जाणून घेवूया

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणपती बाप्पाचे आगमन होण्या करीता आणखी काही दिवस शिल्लक आहेत.मात्र अमरावती जिल्हातील भातकुली तालुक्यातील धामोरी (कसबा) या गावात गणपती बाप्पा नागपंचमीच्या पूर्वसंध्येला गावातील मढी देवस्थानात गणेश मूर्तीची विधीवत स्थापना केली जाते.व नागपंचमीच्या दिवशी या दीड दिवसाच्या गणपती बाप्पाचे विसर्जन केले जाते.विसर्जनाच्या दरम्यान गावातून भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात येते.मिरवणूकी वेळी गावातील प्रत्येक घरा समोर रांगोळी काढली जाते या मिरवणूकीत अनेक गावच्या दिंड्या सहभागी होतात. या प्रथेला धामोरी गावातील सर्व धर्माचे नागरिक एकत्र येवून दीड दिवसाच्या गणपती बाप्पाचे विसर्जन करतात.

गणपती बाप्पाची स्थापना या गावातील हनुमान मंदिरामध्ये



सार्वत्रिक रित्या केली जाते.या प्रथेची सुरुवात२०० ते २५० वर्षापासून या दीड दिवसाच्या गणपती उत्सवाच्या परंपरेला एक इतिहास आहे पूर्वी ग्रामीण भागात शाळा नसायच्या आणि काही निवडक शाळा असल्यास त्या रात्री भरायच्या त्या काळात शाळेत शिकविणाऱ्या एका गुरुजींनी विद्येचे दैवत म्हणून सार्वजनिक रित्या दीड दिवसाच्या गणपती बाप्पाची स्थापना केली होती. तेव्हापासून हा सार्वजनिक गणपती उत्सव सुरू असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले.

# ‘सुराज्य अभियाना’कडून राज्यपालांकडे चौकशीची मागणी!

## राज्यात अनेक बोगस प्रशासकीय अधिकार्यांची नियुक्ती झाल्याची शक्यता !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अकोला–** महाराष्ट्र कॅडरच्या वर्ष २०२३ च्या बॅचच्या भारतीय प्रशासकीय अधिकारी पूजा खेडकर यांनी ‘यूपीएस्सी’ उत्तीर्ण होण्यासाठी दिव्यांग असल्याचे खोटे प्रमाणपत्र जोडल्याचा गंभीर प्रकार नुकताच उघड झाला. केंद्रीय लोकसेवा आयोगाने पूजा खेडेकर यांची उमेदवारी तात्पुरती रद्द केली असून या प्रकरणी न्यायालयात खटलाही चालू आहे. यापूर्वी राज्यात काही बनावट दिव्यांग प्रमाणपत्राचे विषय पुढे आले आहेत. यातून पूजा खेडकर यांच्याप्रमाणे दिव्यांग बनावट प्रमाणपत्रांद्वारे राज्यात भारतीय प्रशासकीय सेवेत किंवा अन्य शासकीय सेवेत आणखीही काही नियुक्त्या झाल्या असल्याची दाट शक्यता आहे. या प्रकारांचे गांभीर्य लक्षात घेऊन दिव्यांग प्रमाणपत्राद्वारे अशा प्रकारे बोगस नियुक्ती झाल्या आहेत का ? याचा शोध घेण्यासाठी दिव्यांग प्रमाणपत्र देणार्या सर्व वैद्यकीय यंत्रणांची त्यादृष्टीने चौकशी करण्याचा आदेश राज्य सरकारला द्यावा, अशी मागणी ‘सुराज्य अभियाना’चे महाराष्ट्र राज्य समन्वयक श्री. अभिषेक मुरुकटे यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा. श्री. सी.पी. राधाकृष्णन् यांना एका निवेदनाद्वारे केली आहे.

यापूर्वी मे २०२२ मध्ये पुणे येथील ससून रुग्णालयाच्या अस्थिरोग विभागातील काही अधिकार्यांनी बनावट अपंग प्रमाणपत्रे दिल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. या प्रकरणाच्या चौकशीसाठी जून २०२२ मध्ये सरकारने त्रिसदस्यीय समितीही स्थापन केली. या प्रकरणाचा ‘चौकशी अहवाल सादर करण्यासाठी’ वैद्यकीय शिक्षण विभागाने जुलै २०२२ आणि ऑक्टोबर २०२२ मध्ये २ वेळा ‘वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालया’च्या आयुक्तांना पत्रेही पाठवली. पुणे येथील भाजपच्या आमदार माधुरी मिसाळ आणि आमदार सुनील कांबळे यांनी ऑगस्ट २०२२ या दिवशी याविषयी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर तत्कालीन वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी बनावट प्रमाणपत्र देण्यात आल्याचा प्रकार ससून रुग्णालयात घडल्याचा प्रकार सत्य असल्याचे मान्यही केले; हे सर्व होऊन या प्रकरणी पुढे मात्र



काहीही झालेले नाही. यातून ही प्रकरणे जाणीवपूर्वक दडपण्यात येत असल्याची शक्यता दिसून येत आहे.

‘सुराज्य अभियाना’च्या वतीने ८ मे २०२४ या दिवशी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचनालय यांना पत्र पाठवून पुणे येथील ससून रुग्णालयाच्या अस्थिरोग विभागातील अधिकार्यांकडून बनावट दिव्यांग प्रमाणपत्रा प्रकरणी कारवाई प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. आधीच भ्रष्टाचाराने प्रशासकीय व्यवस्था पोखरली आहे. त्यात दिव्यांग प्रमाणपत्राद्वारे बोगस अधिकारी नियुक्त झाल्यास ही व्यवस्था कोलमडून पडेल. याचे गांभीर्य आणि भविष्यातील धोका लक्षात घेता राज्यातील प्रशासकीय सेवेचे प्रमुख म्हणून या प्रकरणात राज्यपालांनी स्वत: लक्ष घालावे आणि बनावट दिव्यांग प्रमाणपत्र देणारे आणि घेणारे या दोघांवरही ठोस कायदेशीर कारवाई करण्यासाठी सरकारला आदेश द्यावेत, अशी मागणी ‘सुराज्य अभियाना’च्या वतीने राज्यपालांकडे करण्यात आली आहे.

# जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

## आदिवासी विकास विभागाव्दारे गुणगौरव सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १०अमरावती–** जगातील सर्व देशांमध्ये आदिवासी समाजाचे लोक राहतात. त्यांची भाषा, संस्कृती, सण-उत्सव, चालीरीती, पेहराव या सर्व गोष्टी वेगळ्या आहेत. आदिवासी जमातींचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी, त्यांची संस्कृती आणि आदर-सन्मान जतन करण्यासाठी आदिवासी दिन सर्वत्र साजरा करण्यात येतो. आदिवासी बांधवांच्या सर्वांगिण विकासासाठी विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या आदिवासी घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे, अशा सूचना अपर आयुक्त (आदिवासी विकास) सुरेश वानखेडे यांनी संबंधित यंत्रणांना आज केल्या. आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थींच्या गुणगौरव सोहळा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनातून जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

९ ऑगस्ट, जागतिक आदिवासी दिनानिमित्त येथील आदिवासी विकास विभागाव्दारे कार्यालयाच्या परिसरात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विशेष अतिथी म्हणून पोलीस उप आयुक्त सागर पाटील व प्रमुख अतिथी म्हणून वरिष्ठ कोषागार अधिकारी श्रीमती शिल्पा पवार, माजी महापौर वंदनाताई कंगाले उपस्थित होत्या. तसेच ज्येष्ठ आदिवासी समाजसेविका श्रीमती महानंदाताई टेकाम, आदिवासी समाजसेवक विठ्ठल मरापे, रामेश्वर इवनाथे यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला होती.

प्रारंभी थोर पुरुषांच्या पुजन व दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कलावैभव शिक्षण संस्थेव्दारे प्रशिक्षित चिरोडी शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता सातवी ते दहावीच्या विद्यार्थीनींनी यावेळी स्वागत गीत सादर केले. विभाग अधिनस्त आदिवासी आश्रमशाळा व वसतीगृहाच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींनी विविध आदिवासी नृत्य सादर केले. चिरोडी शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता तिसरीच्या कु. उन्नती मरकाम व इयत्ता चौथीच्या कु. रेणु बेठेकर या चिमुकल्या विद्यार्थीनींनी आदिवासी दिनानिमित्त सुंदर भाषण दिले. कार्यक्रमाला उपस्थित विशेष व प्रमुख अतिथी तसेच आदिवासी समाजसेवकांनी आदिवासी समाजाच्या प्रगतीच्या वाटचालीसंबंधी त्यांचे मनोगत व्यक्त केले.




यावेळी अमरावती आदिवासी विकास विभागांतर्गत एकूण सात प्रकल्पातील प्रकल्पनिहाय उत्कृष्ट आश्रमशाळा व रंगबिरंगी आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच अपर आयुक्त कार्यालय, प्रकल्प कार्यालय तसेच आश्रमशाळा व वसतिगृहातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रोत्साहनपर प्रमाणपत्र देऊन गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. अपर आयुक्त सुरेश वानखेडे अमरावती यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आपत्ती व्यवस्थापन जनजागृती मॅरेथान रॅलीला मान्यवरांनी दाखविली हिरवी झेंडी

## आपत्तीच्या काळात संपर्क, संवाद साधून योग्य समन्वय ठेवा-जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती,** नैसर्गिक आपत्तीच्या कालावधीत परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्वांनी आपापसात योग्य समन्वय ठेवून संपर्क, संवाद ठेवावे जेणेकरून कोणत्याही परिस्थितीत आपत्तीमध्ये हानी होणार नाही. तसेच आपत्ती व्यवस्थापनाबाबत सर्वांनी सजग राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय, मनीबाई गुजराती हायस्कूल अमरावती व चौरंग संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्यामार्फत जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन जनजागृती मॅरथान रॅलीला आज मान्यवरांच्या हस्ते मनीबाई गुजराती हायस्कूलच्या प्रांगणात हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले. यावेळी जिलहाधिकारी सौरभ कटियार, पोलीस अधीक्षक विशाल आनंद,






निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, मनीबाई गुजराती हायस्कूलचे मुख्याध्यापिका अंजली देव, तहसीलदार डॉ. प्रशांत पडघन, अधीक्षक डॉ. निलेश खटके, विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक अमरजीत चोरपगार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले की, आपत्तीच्या काळात आपण सदैव तयार असावे. आपत्तीमध्ये कोणतीही मदत लवकर मिळणे शक्य नाही. अशावेळी सुरक्षित राहण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाविषयी सर्वांना माहिती असणे आवश्यक आहे. यासाठी शाळा, महाविद्यालयस्तरावर व जनसामान्यपर्यंत आपत्ती व्यवस्थापना बाबत व्यापक जनजागृती करणे आवश्यक असून प्रत्येकांनी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

मॅरथॉन रॅलीची सुरुवात मनीबाई गुजराती हायस्कूलच्या प्रांगणापासून झाली. यावेळी मॅरेथॉनमध्ये विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र व मेडल देऊन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन मंगेश व्यवहारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धिरज शर्मा, जयंत मुंजे, अरुण पाठक, प्रफुल मेहता, मुकेश पाटणकर, सरिता गायकवाड, जिल्हा शोध व बचाव पथकातील सर्व कर्मचारी शिक्षकांनी सहकार्य केले.

# बच्चू कडूंच्या मोर्चासाठी महिलांची दिशाभूल सहलीसाठी नेत असल्याचे सांगत नेले मोर्च्याला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०भंडारा**

छत्रपती संभाजीनगर येथे प्रहार जनशक्तीचे प्रमुख बच्चू कडू यांच्या भव्य मोर्चासाठी भंडारा जिल्ह्यातील जवळपास दीड हजार महिलांना दिशाभूल करून नेण्यात आले. बचत गटाच्या माध्यमातून या महिलांना सहलीसाठी नेत असल्याचे सांगून मोर्च्यात सहभागी होण्यासाठी नेण्यात आले. मात्र दोन दिवसांपासून या सर्व महिलांना वाऱ्यावर सोडण्यात आले असून त्यांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे महिलांनी सांगितले. काल रात्री 'लोकसत्ता' मध्ये याबाबत वृत्त प्रकाशित होताच एकच खळबळ उडाली. छत्रपती संभाजीनगर येथील प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी ताबडतोब दखल घेत या महिलांच्या मदतीला धाव घेतली. सध्या काही महिला शेगाव येथे तर काही परतीच्या प्रवासात आहेत.



काल ९ ऑगस्ट रोजी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांचा छत्रपती संभाजीनगर येथे मोर्चा काढण्यात आला. या मोर्च्यात गर्दी करण्यासाठी सर्वच जिल्ह्यातील प्रहार संघटनेचे कार्यकर्ते सहभागी झाले. मात्र भंडारा जिल्ह्यात प्रहार जनशक्ती पक्षाचे सभासद मंडळ बरखास्त असल्याने प्रहारचे माजी जिल्हाध्यक्ष अंकुश वंजारी यांनी ही जबाबदारी घेतली. त्यांनी युक्ती लढवून बचत गटातील महिलांना शेगाव, शिर्डी आणि औरंगाबाद येथे सहलीला नेत असल्याचे खोटे सांगून वेठीस धरले. गुंथारा, खुटसावरी, चांदोरी, कवलेवाडा, धारगाव, पहेला, टेकेपार, सातोना, खुरशीपार, राजेदहेगाव अशा विविध गावांतील बचत गटाच्या भंडारा जिल्ह्यातील ३० ते ४० ट्रॅव्हलची व्यवस्था करण्यात आली. यात जवळपास दीड हजार महिलांना नेण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर येथे पोहचल्यावर मोर्च्यात सहभागी होण्याबाबत महिलांना सांगण्यात आले. मात्र काही महिलांनी त्यासाठी नकार दिला तर काही महिला सहभागी झाल्या. एका महिलेने सांगितले की, काल त्यांच्या ट्रॅव्हल्स औरंगाबाद येथेच अडून होत्या. ट्रॅव्हल्स कंपनीला पैसे दिले नाही त्यामुळे डिझेल संपल्याने ट्रॅव्हल्स चालक अडून बसले होते. दोन दिवसांपासून या महिला आणि लहान मुले नाश्तावर असून राहण्याची, खाण्याची किंवा परत जाण्याची कोणतीही सोय नसल्याने या महिलांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागला. गीता बंसोड यांनी काल प्रसारमाध्यमांसोबत 'आपबिती सांगितली. त्यानंतर माध्यमांवर बातमी येताच सर्वत्र खळबळ उडाली. अखेर काही त्रस्त महिलांनी कदीन जालना पोलिस ठाणे गाठले. याबाबत भंडारा जिल्हा पोलीस अधिक्षक लोहित मतानी यांनी औरंगाबादचे पोलीस अधीक्षक यांच्याशी संपर्क साधला आणि महिलांना काही मदत करता येईल का याबाबत बोलणे केले. त्यानंतर महिलांना एका ढाब्यावर जेवणासाठी नेण्यात आले. मात्र जेवणाचे बील या महिलांनीच स्वतःच्या खिशातून भरल्याचे त्यांनी सांगितले.

गीता बन्सोड यांनी माध्यमांना माहिती पुरवू नये म्हणून त्यांच्या बचत गटाच्या ग्रुप मध्ये आता त्यांना ब्लॉक करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. हा धक्कादायक प्रकार माध्यमांवर येताच काल छत्रपती संभाजीनगर येथील पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी या ट्रॅव्हल्स चालकांशी संपर्क करीत तिथे पोहचले. या महिलाना परत येण्यासाठी प्रत्येक ट्रॅव्हल्समध्ये डिझेल भरून देण्यात आले. सध्या काही महिला परतीच्या मार्गावर आहेत तर काही शेगाव येथे आहेत.

बच्चू कडू यांच्या स्वीय सहाय्यकांकडून प्राप्त माहितीनुसार, प्रत्येक जिल्ह्यातून येणाऱ्या ट्रॅव्हल्स मालकांना देण्यासाठी ५० टक्के रक्कम सुरवातीला देण्यात आली होती. त्यानुसार भंडारा जिल्ह्यात अंकुश वंजारी याला ५० टक्के रक्कम देण्यात आली होती. मात्र पैसे घेतल्यानंतर तो मोबाईल बंद करून फरार झाला आहे. त्यामुळे त्याच्याशी संपर्क झालेला नाही. बच्चू कडू यांचे स्विय सहायक्कानी सांगितले की , अंकुश वंजारी आधीच बरखास्त होता, आता पक्षाच्या वतीने त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास अंकुश वंजारी याच्याविरोधात पोलीस ठाण्यात ४२० अंतर्गत तक्रार करण्यात येईल.

# आदिवासी परंपरा, संस्कृती जतन करण्याची सर्वांची जबाबदारी : आ प्रताप अडसड

## शहरात पहिल्यांदाच निघाली रॅली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०धामणगाव रेल्वे**

मुल निवासी ,शांत निसर्गाच्या सान्निध्यात राहून निसर्गावर प्रेम करणारा व निसर्गाचे संरक्षण, संवर्धन करणाऱ्या आदिवासी समाजाचा देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान आहे बदलत्या जगात आपली परंपरा संस्कृती टिकून ठेवण्याची जबाबदारी आता नवयुवका वर असल्याचे मत आमदार प्रताप अडसड यांनी व्यक्त केलेजागतिक आदिवासी दिनानिमित्त धामणगाव शहरात पहिल्यांदाच दत्तापूर येथून रॅली काढण्यात भगवान बिरसा मुंडा डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमा ट्रॅक्टर वर सजविण्यात आल्या होत्या तर बिरसा मुंडा यांचे चे सचित्र दर्शन या रॅलीतून झाले आदिवासी जंगल रखवालो रे, पहिले बिरसा मुंडाला वंदन करू ,साजरा करू आदिवासी दिवस अशा नृत्यावर आमदार प्रताप अडसड थिरकले भाजपाचे धामणगाव विधानसभा प्रमुख रावसाहेब रोठे यांनी यावेळी सहभाग घेतला होतादत्तापूर पासून बस स्थानक ते पुढे अमर शहीद भगतसिंग चौक ,गांधी चौक, शास्त्री चौक शिवाजी चौक पर्यंत निघालेल्या मिरवणुक मध्ये प्रचंड उत्साह ओथंबून वाहत होता..महिला, पुरुष, तरुण-तरुणी आपल्या पारंपरिक वेशात मिरवणुकीत ढोलाच्या तालावर ठेका धरत होते. अग्रभागी पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या चिमुकल्यांनी सर्वाचे लक्ष वेधून घेतले.धामणगाव रेल्वे , चांदुर रेल्वे येथील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती यावेळी दत्तापूर पोलिसांचे सहकार्य लाभले.


# उद्याला संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात 'स्वर मल्हार'

## गुरुकुल बहूउद्देश्य शिक्षण संस्था व तुषार भारतीय मित्र परिवार तर्फे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती**

भारतीय संगीताची परंपरा जगातली सर्वांत जुनी व महान आहे. ती आजही कायम असून संगीताला बकुळीच्या फुलाप्रमाणे जपण्यात आले आहे. तानसेनपासून तर गानकोकिळा लता मंगेशकर त्यांच्या कलाविष्काराने ते अधिक समृध्द झाले आहे. याच परंपरा कायम राहण्याच्या दृष्टीने स्वर मल्हार हि शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत मैफिल आयोजित केली आहे .महाराष्ट्राचे प्रसिध्द गायक पंडित प्रसाद खापर्डे यांचे गायन व गझलकार नितीन भट याचे निवेदन असा योग जुळून आला आहे . या संगीत मैफिल मध्ये साथ संगत तबला श्री मयंक बेडेकर , हार्मोनियम वर श्री श्रीकांत पिसे , सारंगी वर उ फारुख लतीफ खान करणार आहे. स्वर मल्हार शास्त्रीय व उपशास्त्रीय हि संगीत मैफिल ११ ऑगस्ट २०२४ रोजी सायं ६ वा संत ज्ञानेश्वर महाराज सांस्कृतिक सभागृह ,मोर्शी रोड , अमरावती येथे आयोजित केली आहे .

गुरुकुल बहूउद्देश्य शिक्षण संस्थाच्या वतीने दरवर्षी अमृतमंथन हि व्याख्यानमला , माजी




प्रधानमंत्री स्व अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा असे अनेक उपक्रम आयोजित करत असते .

स्वर मल्हार शास्त्रीय व उपशास्त्रीय या संगीत मैफिलीचे आनंद सर्व रसिकांनी घ्यावा , असे आवाहन गुरुकुल शिक्षण बहूद्देशिय संस्था अध्यक्ष तथा मनपा माजी स्थायी समिती सभापती तुषार भारतीय यांनी केले आहे

# विभागीय आयुक्तालयात १२ ऑगस्टला विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसर्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी (दि. १२ ऑगस्ट रोजी) सकाळी ११ वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे.

विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. नागरिकांनी तक्रार अर्ज dbgamravatigmail.bom किंवा dbgamravatirediffmail.bom या ई-मेलवर विहित नमुन्यात पाठविण्याचे आवाहन आयुक्तालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

# पुढील आठवड्यात दुसरी फेरी; प्रतीक्षा यादीतील मुलांना संधी आरटीईच्या पहिल्या फेरीत १४८७ बालकांचे प्रवेश झाले निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

शालेय शिक्षण विभागातर्फे आरटीई प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया राबवण्यात आली. प्रवेशासाठी निवड झालेल्या २ हजार ३०० विद्यार्थ्यांपैकी शेवटच्या दिवसापर्यंत १ हजार ४८७ विद्याथ्र्यांनी आपले आरटीईचे प्रवेश निश्चित केले. गुरुवारी शेवटचा दिवस असताना प्रवेश प्रक्रियेला मुदत देण्याच्या सूचना न मिळाल्याने आता आरटीईच्या अन्य रिक्त जागाप्रतीक्षा यादीतून भरल्या जातील.आरटीई प्रवेश प्रक्रियेतून निवड झालेल्या पाल्यांचे प्रवेश घेण्यासाठी ५ ऑगस्टपर्यंत संधी दिली होती. मात्र, पालकांच्या तसेच विविध सामाजिक संघटनांच्या मागणीनुसार याला तीन दिवसांची मुदतवाढ देत ८ ऑगस्टपर्यंत प्रवेश घेण्याची




संधी दिली. या दरम्यान आरटीई प्रवेशासाठी निवड झालेल्या २३०० पैकी केवळ १ हजार ४८७ पाल्यांचे प्रवेश निश्चित केले आहेत. जिल्ह्यात आरटीई प्रवेशासाठी रस शाळांमध्ये २ हजार ३६९ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी जिल्ह्यातून ६ हजार ६२६ विद्यार्थ्यांचे अर्ज आले आहेत. त्यापैकी २ हजार ३०० विद्यार्थ्यांची लकी ड्रॉच्या माध्यमातून झाली निवड आहे. प्रवेशासाठी २ हजार ३०० बालकांची निवड होऊन केवळ १ हजार ४८७ विद्याथ्र्यांचे प्रवेश आतापर्यंत निश्चित झाल्याचे दाखवले जात असले तरी प्रलंबित अर्ज शून्य करण्याची प्रक्रिया मात्र प्रशासकीय स्तरावर सुरू आहे. याकरिता दोन दिवसांचा वेळ दिला आहे. त्यामुळे प्रवेशाच्या संख्येत देखील वाढ होण्याची शक्यता आहे. शून्य पेंडन्सीनंतर उर्वरित रिक्त जागा प्रतीक्षा यादीतील मुलांमधून भरल्या जाणार आहे. प्रवेश प्रक्रियेच्या या दुसर्या फेरीला पुढील आठवड्यात सुरुवात होणार आहे.

# प्रा राम मेघे इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेन्ट येथे रस्ता सुरक्षा व वाहतुकीचे नियम या विषयी कार्यशाळेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० बडनेरा**

येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे महाविद्यालयात दिनांक ३० जुले २०२४ रोजी रोडसेफ्टी शिबिराचेआयोजन करण्यात आले. रस्त्यावर वाहन चालवताना लोकांच्या चुकांमुळे अनेक रस्ते अपघात व रस्त्याच्या कडेला झालेल्या दुखापतीचा धोका कमी करण्यासाठी, रस्ता सुरक्षा हा एक सुरक्षा उपाय आहे. ड्रायव्हिंगच्या चुकांमुळे आणि रस्त्यांवरील वाहतूक नियमांचे पालन न केल्यामुळे, दररोज अपघातात होणारे मृत्यू मोजू शकत नाही. रस्त्यावरून



जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला दुखापत किंवा मृत्यूचा धोका असतो. जसे की पादचारी, वाहनचालक, सायकलस्वार, प्रवासी इ. प्रत्येकाला रस्ते वाहतुकीच्या नियमांची चांगली जाणीव असणे आवश्यक आहे, विशेषत: लहान मुले आणि तरुण ज्यांना रस्ते अपघाताचा धोका आहे. आकडेवारीनुसार (वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन, २००८), असे आढळून आले आहे की हॉस्पिटलमध्ये भरती झालेली बहुतेक प्रकरणे आणि मृत्यूचे प्रमुख कारण रस्त्यावरील अपघातामुळे होते. या सर्व गोष्टी टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वाहतुकीचे नियम व वाहतुकी दरम्यान घ्यावयाची काळजी याबद्दल TVS Motors यांच्या चमुद्वारे मार्गदर्शन व वाहतुकीचे नियम समजावून सांगण्यात आले. तसेच अपघातानंतर प्रथम उपचाराविषयी माहिती देण्यात आली. शिबिरादरम्यान वाहतुकीच्या नियमा बद्दल प्रश्नमंजुषा घेण्यात आली व त्यामध्ये विजेता मोहित राऊत, स्वराज तालोकर, प्रणव माहुरे, प्रणय सावरकर या विद्यार्थ्यांना आकर्षक भेट वस्तू देण्यात आल्या. बक्षीस वितरणासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा पि व्ही खांडवे, सर्व विभाग प्रमुख, महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग, तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी, ऑफिस कर्मचारी व १००० पेक्षा जास्त महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थिती होते.शिबिराचे आयोजन रासेयो चे कार्यक्रम अधिकारी प्रा. शुभम कदम, , सहकारी वर्ग, प्रा., अमोल नेरकर , प्रा विजय खंडार , श्री. अंकुर मोहोड यांच्या सहभागाने केले तसेच शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील सर्व रासेयो स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहकार्य केले.

# कैद्याने केली कारागृह प्रशासनाची फसवणूक

## कर्मचाऱ्यासह बंदीविरुध्द गुन्हा दाखल : अमरावती कारागृहातील अफलातून प्रकार उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

पदव्युत्तर पदवी असली तर - शिक्षा ९० दिवस कमी असा कारागृहाचा नियम या नियमाचा गैरफायदा एका कैद्याने अन्य दोन ना माफीनामा प्रस्तावात बोड करून आणि स्वतःकडे बदव्या असल्याचे भासवून १९५ दिवसाची शिक्षा कमी घेतल्याचा अफलातून प्रकार स आला. या प्रकाराने प्रशासनात चांगलीच - उडाली आहे. या प्रकरणी - पोलिसांनी तुरुंग अधिकारी अशोकराव गुंडरे यांच्या रून त्या कैद्यासह एका विरुध्द गुन्हा नोंदविला. चारसु बहऱ्हाटे (वय ४९, कर्मचारी) तर बंदी क्र. शिवचंद्र प्राण बनसोड -७ मुढधी ब्राम्हवाडा अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

बंदी शिवचंद्र बनसोड विरुध्द पुसद ठाण्यात २०१७ मध्ये बलात्कार, पोक्सोसह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल आहे.सदरच्या गुन्ह्यात बनसोड याला न्यायालयाने १० वर्ष शिक्षा व ३ हजार ५०० रुपये दंड, दंड न भरल्यास अतिरिक्त ३ महिने कारावासाची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर १९ सप्टेंबर २०१९ रोजी त्याची अमरावती कारागृहात रवानगी करण्यात आली होती. अमरावती कारागृहात असताना बनसोडची वागणुक चांगली असल्याने कारागृह अधिकाऱ्यांनी त्याला काही महिन्यानंतर कारागृहातील कार्यालयीन कामकाजाकरीता ठेवले होते.



बनसोड दिवसभर कार्यालयात काम करीत असल्यामुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांचा त्याच्यावर विश्वास बसला. त्यानंतर तो कार्यालयीन संगणकावरसुध्दा काम करू लागला. संगणकावर काम करीत असताना त्याने अन्य बंदीचे माफीनामे मागितल्याचे ऑनलाईन अर्ज बघितले. तेव्हा त्याच्या लक्षात आले की, पदव्युत्तर पदवी असली तर ९० दिवसाची शिक्षा कमी होते. त्यामुळे त्यानेकारागृहातील बंदी सुदर्शन विघणे आणि राहुल शिरसाट यांचा माफीनामा अर्ज पाहिला आणि त्यांच्या बी.ए. एम.ए. आणि योग शिक्षक पदविधर अशा तीन डिग्री स्वतःच्या नावावर करून कारागृह प्रशासनाला ऑनलाईन माफीनामा सादर केला. त्यावरून ५ ऑगस्टला नागपुर कारागृहाचे उपमहानिरीक्षकांनी त्याची ऑनलाईन व्हिसी घेतली. बनसोड याने सादर केलेल्या डिग्रीबाबत त्याला विचारपूस करण्यात आली. तेव्हा तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. उपमहानिरीक्षकांना संशय आल्याने त्यांनी त्याच्या डिग्रीची चौकशी करण्याचे आदेश अमरावती कारागृह अधिक्षकांना दिले. त्याआधारावर संबंधीत अधिकाऱ्यांनी दोन दिवसात बनसोड याच्या शैक्षणिक कागदपत्राची पाहणी केली. त्याच्याकडे एकही पदवी नव्हती. त्याची कसून चौकशी केली असता कारागृहातील दोन बंदी च्यापदव्या स्वतःच्या नावाने केल्या आणि सदर प्रस्ताव लिपिक सुहास बऱ्हाटे यांच्याकडे दिला. त्यांनी सदर प्रस्तावाची पाहणी न करता तो वरिष्ठांदा सादर केल्याचे चौकशीत समोर आले नकारगृह प्रशासनाने संबंधीत कर्मचाऱ्यासह बंदी बनसोडविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्या आधारावर तुरुंग अधिकारी उमेश गुंडरे यांनी ८ ऑगस्ट रोजी फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या घटनेमुळे अमरावतीसह महाराष्ट्रातील कारागृह प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली असून माफीनामा अर्ज सादर करणाऱ्या बंदीच्या शैक्षणीक कागदपत्राची पाहणी जेल प्रशासनाने सुरु केली आहे.

# काल महायुतीला इशारा आज बच्चू कडू यांची पवारांसोबत भेट

## कडूंच्या मनात चालले तरी काय ?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० पुणे

राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. महायुती सरकारमधील अनेक नेते महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या भेटी घेत आहेत, अशातच आज(शनिवारी) सकाळी प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू शरद पवारांची भेट घेण्यासाठी मोदी बागेत आले आहेत. साडे आठ वाजता मोदीबागेत घेणार शरद पवारांची भेट होणार असल्याची माहिती आहे. बच्चू कडू महाविकास आघाडीत सहभागी होण्यास इच्छुक आहेत का अशा चर्चा आता या भेटीमुळे सुरू झाली आहे. बच्चू कडू शिवसेना पक्षफुटीच्या वेळी एकनाथ शिंदेसोबत गेले होते.



गेल्या अनेक दिवसांपासून बच्चू कडू आणि महायुती यांच्यात धुसफूस चालू आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी महायुतीच्या अमरावतीच्या उमेदवाराला थेट विरोध केला होता. नवनीत राणा यांच्या उमेदवारीला आमचा विरोध आहे, अशी भूमिका घेत त्यांनी थेट भाजपाच्या उमेदवार नवनीत राणा यांच्याविरोधात प्रचार केला होता. आपल्या प्रहार संघटनेच्या वतीने त्यांनी आपला उमेदवार उभा केला होता. लोकसभा निवडणुकीत कडू यांनी आपला उमेदवार मागे घ्यावा, यासाठी महायुतीकडून प्रयत्न करण्यात आला होता. पण त्याला यश आले नाही. शेवटी अमरवाती या जागेवर भाजपाच्या उमेदवारा विजय झाला. तेव्हापासून बच्चू कडू यांनी दिव्यांगांचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या समस्या या मुद्द्यांवर वेळोवेळी वेगळी भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता बच्चू कडू आणि खासदार शरद पवार यांच्यात नेमकी काय चर्चा होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू हे आज भेटीसाठी मोदी बागेत आल्यानंतर त्यांनी या भेटीबाबत माध्यमांशी संवाद साधला यावेळी त्यांनी शेतकरी, दिव्यांगासाठी वेळ पडली तर काहीही करू असं सूचक विधान त्यांनी केलं आहे.

### भेटीदरम्यान कोणत्या गोष्टींवर चर्चा?

यावेळी बोलताना बच्चू कडू म्हणाले, ही भेट आधीच ठरलेली होती. काही मुद्द्यावर चर्चा करायची आहे. शेतकरी, मजुरांचे प्रश्न महत्वाचे आहेत. अंपगाचे प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी सरकारला १ सप्टेंबर पर्यंत वेळ दिली आहे. त्यानंतर मी माझा पुढचा निर्णय घेईल. ऋयाच मुद्द्यांवर आज शरद पवार यांची भेट घेत आहे. मला अंपग, शेतकरी, मजुर यांचे प्रश्न महत्वाचे आहेत. हे प्रश्न सोडवणं महत्वाचं आहे. त्यासाठी मी काहीही निर्णय घेऊ शकतो. या मुद्यावरूनच कोणाबरोबर जायचे याचा निर्णय होईल, असं देखील त्यांनी यावेळी म्हटलं आहे.

आम्ही काल जे मुद्दे मांडले त्यावरती चर्चा मी शरद पवारांशी करणार आहे. १ सप्टेंबर पर्यंत महायुतीला वेळ दिला आहे. त्यांच्यासोबत बाकी कोणते पक्ष या मुद्द्यांवर चर्चा करतील त्यांचे मत सांगतील, त्यासाठी शरद पवारांची भेट घेत आहोत, असं यावेळी त्यांनी म्हटलं आहे. नाराजीबाबतच्या प्रश्नावर बोलताना बच्चू कडू म्हणाले, मी कोणावरती नाराज नाही. राणा दाम्पत्याचा बरोबर असलेल्या वादाचा येथे काहीही संबंध नाही.

### आजच्या बैठकीत शरद पवारांनी ऑफर दिली तर?

आजच्या शरद पवारांसोबत होणाऱ्या बैठकीत शरद पवारांनी ऑफर दिली तर या प्रश्नावर बोलताना बच्चू कडू (म्हणाले, १ सप्टेंबर पर्यंत आम्ही कोणताही निर्णय घेणार नाही. सरकारला वेळ देणार आहे, शरद पवारांशी चर्चा करणार आहे, शेतमजूर, दिव्यांग यांच्या प्रश्नासाठी आम्ही काहीही करू असं देखील त्यांनी यावेळी म्हटलं आहे.

# काँग्रेस आता मनोरंजन करीत विचार प्रसार करणार, काय आहे हा उपक्रम?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० अमरावती

विधानसभा निवडणुकीची चाहूल लागली असल्याने विविध राजकीय पक्ष कामाला लागल्याचे दिसून येत आहे. काँग्रेस पण आता त्यात मागे नाही. मनोरंजनातून काँग्रेस पक्षाची विचारधारा व योजना पोहोचविण्याचा मार्ग एक लोकमान्य मार्ग असल्याचे प्रदेश काँग्रेसने स्पष्ट केला आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचाच हा उपक्रम आहे. त्यासाठी ब्लॉक स्तरावर कलापथक स्थापन करण्याचा निर्णय झाला.



पक्षाची विचारधारा प्रामुख्याने मतदारापर्यंत नेण्यासाठी हा उपक्रम असून राष्ट्रीय व राज्य पातळीवर पक्षप्रणित स्वातंत्र्योत्तर काळापासून ते आजपर्यंत राबविलेल्या योजणांची माहिती सोप्या व मनोरंजक पद्धतीने देण्याचा हेतू आहे. काँग्रेसचे सांस्कृतिक व लोक कलावंत असे दोन विभाग असून अत्यंत गुणी कलावंतांनी ते युक्त असल्याचे प्रदेश समितीचे म्हणणे आहे. त्यांचा येत्या विधानसभा तसेच त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाला मोठा फायदा होवू शकतो. प्रत्येक ब्लॉक स्तरावर असे कलापथक १५ ऑगस्टपर्यंत स्थापन करण्याची सूचना आहे. तशी जबाबदारी जिल्हाध्यक्षांची राहणार. सांस्कृतिक व लोककला विभागप्रमुखांना त्यासाठी बैठका घ्यायच्या आहेत. १५ ऑगस्टला पथकचे उद्घाटन करायचे आहे.ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर अश्या तीन महिन्यांच्या कार्यक्रमाची आखणी होणार. त्याची ३१ ऑगस्टपर्यंत प्रदेश समितीस माहिती द्यायची आहे. प्रथम मोठ्या गावी व त्यानंतर सर्व तालुक्यांतील गावांत कार्यक्रम घेण्याची सूचना आहे. प्रसिद्धी, वाहन व्यवस्था, स्थळाची व्यवस्था व इतर सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी जिल्हाध्यक्ष तसेच ब्लॉक अध्यक्षवर टाकण्यात आली आहे. विभागाच्या राज्य प्रमुखांनी या सर्व मोहिमेवर लक्ष ठेवून ती फत्ते करण्याची जबाबदारी पार पाडावी. कार्यक्रम व कलावंत सहभाग नियोजन त्यांनाच करायचे आहे. या राज्यस्तरीय प्रमुखांनी राज्यभर दौरे करावे. ब्लॉक पातळीवरील कार्यक्रम यशस्वी होत असल्याची खात्री करुण घ्यावी. त्याचा दरमहा अहवाल द्यावा, असेही निर्देश प्रदेश समितीतर्फे दिले आहेत. प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी या कला पथक उपक्रमाची नियोजनबद्ध आखणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या सोबतच नागरिकांना मदत करण्यासाठी नागरिक मदत व मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्याची सूचना प्रदेश समितीने पक्षाच्या जिल्हा व ब्लॉक अध्यक्ष यांना केली आहे. अभ्यासू तरुणांनासोबत घेत हे केंद्र सुरू करायचे आहे.

# अमरावती जिल्ह्यात विश्रांती नंतर पुन्हा पावसाची हजेरी

विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती

दोन दिवसाच्या विश्रांती नंतर शनिवारी सकाळ पासून अमरावती जिल्ह्यात पावसाने पुन्हा सुरूवात केली आहे.शुक्रवारी जिह्यात ढगाळ वातावरण होते मात्र आज शनिवार सकाळ पासूनच पावसाने हजेरी लावली आहे त्यामुळे हवामानात गारवा जाणवत आहे.

जुळे महिन्यात महिनाभर अधून मधून सुरू असलेल्या एक सारख्या पावसाने पासून थोडी उसंत घेतली होती.त्यामुळे शेतीच्या कामांनी चांगला वेग धरला होता खरीप पिकांना खतांचा डोस देण्यास सुरूवात झाली होती मात्र आज सकाळ पासून पावसाने पुन्हा सुरूवात केली आहे.



धरणक्षेत्रातही पाऊस सुरू आहे त्यामुळे अप्पर वर्धा धरणाचे दोन दरवाजे उघडण्यात आले आहे तर जिल्ह्यात सर्व प्रकल्प ओव्हर फ्लो झाले आहेत त्यामुळे नदी नाले ओसंडून वाहत आहे

# अहो हे काय... लालपरीलाही लावली ठिगळं!

## बसची अवस्था बिकट : बसवर महामंडळाची सिल्व्हर मलमपट्टी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०परतवाडा

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीला नवीन पद्धतीची ठिगळं लावली आहेत. सिल्व्हर रंगाची पत्र्याची पट्टी लावलेल्या बस आढळून येत आहेत. परिवहन महामंडळाच्या अनेक बसची अवस्था बिकट झाली आहे. बस भंगार झाल्या आहेत. याच बसवर परिवहन महामंडळ ठिगळं लावून मलमपट्टी करीत आहेत.

प्रवाशांना जिल्ह्याच्या ठिकाणी, शहरात किंवा इतर कुठेही जाण्यास लालपरी समजल्या जाणाऱ्या एसटीतूनच प्रवास करावा लागतो. एसटीचा प्रवास सुखाचा असे समजले जाते. म्हणून अनेकजण बसमधून प्रवास करतात.



सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. या दिवसांत रस्त्यावर धावणाऱ्यालालपरीमधून पावसाचे पाणी गळत असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होते. जिल्ह्यातून धावणाऱ्या अनेक बसची अशी अवस्था आहे. एसटी महामंडळाद्वारे मिळणाऱ्या सवलतीचा सर्व शाळेचे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला प्रवासी लाभ घेतात.जिल्ह्यातील अनेक बसेस ची अवस्था ही भंगार असून पावसाळ्यात अनेक बसेसवर सिल्व्हर पट्टी लावलेली दिसत आहे.आता महामंडळाने अशा बसवर ठिगळं लावणे सुरू केले आहे. प्रवाशांची गैरसोय होऊ नये, याकडे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने लक्ष द्यावे व नवीन गाड्या उपलब्ध कराव्यात, अशी मागणी आहे.

### ग्रामीण भागात भंगार गाड्या

शहरी व लांब पल्ल्यासाठी परिवहन महामंडळाकडून शिवशाही बस, निमआराम बसची सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. शिवाय या बसची अवस्थाही बऱ्यापैकी चांगली असते. मात्र, ग्रामीण भागात भंगार झालेल्या बस पाठविण्यात येतात. योग्य सोयीसुविधायुक्त बस ग्रामीण भागातही पाठविण्यात याव्यात, अशी मागणी आहे.

# अमरावती, बडनेऱ्यात काँग्रेसच्या उमेदवारीसाठी १० इच्छुकांचे अर्ज

## डॉ. देशमुख, एडतकर, शेखावत, इंगोले, कदम, विश्वास देशमुख यांचा समावेश



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१०अमरावती

आगामी विधानसभा अमरावती व बडनेरा विधानसभा मतदारसंघासाठी प्रत्येकी पाच इच्छुकांनी शहर काँग्रेस कमिटी कार्यालयाकडे अर्ज दाखल केले असून अर्ज दाखल करण्याची शनिवारी (ता. दहा) शेवटची तारीख आहे. शनिवारी सायंकाळपर्यंत अर्जाच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

विधानसभेच्या अमरावती मतदारसंघातून माजीमंत्री डॉ. सुनील देशमुख, गौरी इन हॉटेलचे संचालक सचिन हिवसे, शहर काँग्रेसचे माजी अध्यक्ष विश्वासराव देशमुख,शहर अध्यक्ष बबलू शेखावत,माजी महापौर विलास इंगोले यांनी तसेच विधानसभेच्या बडनेरा मतदारसंघातून प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते अॅड. दिलिप एडतकर, संकल्प बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष नितीन कदम, शहर युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष मुन्ना राठोड, संदेश गवई आणि पंकज मेश्राम आदींनी पक्षाकडे उमेदवारीसाठी अर्ज दाखल केलेलेआहे. संबंधित सर्वच अर्ज शनिवारी (ता. नऊ) प्राप्त झाल्याची माहिती शहराध्यक्ष बबलू शेखावत यांनी दिली. काँग्रेस पक्षाकडे उमेदवारी मागण्याचे अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १० ऑगस्ट असून अखेरच्या दिवशी सायंकाळपर्यंत या अर्ज संख्येत वाढ होण्याची शक्यता बबलू शेखावत यांनी वर्तविली.

### दर्यापूर, मेळघाटमधून सर्वाधिक अर्ज

अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीकडे तिवसा, दर्यापूर, मोर्शी, अचलपूर, मेळघाट, चांदूररेल्वे या सहा मतदारसंघाची जबाबदारी आहे. त्यापैकी दर्यापूर आणि मेळघाट मतदारसंघातून सर्वाधिक अर्ज मिळाल्याची माहिती जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध ऊपाख्य बबलू देशमुख यांनी दिली.

# समृद्धीचा अंतिम टप्पा, सप्टेंबरअखेर सेवेत

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१० नागपूर

महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा इगतपुरी ते ठाण्यातील आमने हा शेवटचा ७६ किमी लांबीचा टप्पा येत्या सप्टेंबरअखेर पूर्ण होणार आहे. त्यानंतर हा मार्ग वाहतुकीसाठी खुला होईल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.



समृद्धी महामार्गाचा शेवटचा टप्पा वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर इगतपुरी ते आमने हा प्रवास सव्वा तासात पूर्ण करता येणार आहे. तर नाशिक ते ठाणे हा प्रवास समृद्धीवरून अडीच तासात पूर्ण करणे शक्य होणार आहे. या शेवटच्या टप्प्यात अभियांत्रिकीच्या दृष्टीने किचकट पूल आणि बोगद्यांचा समावेश आहे. त्यामध्ये ८ किमी लांबीच्या बोगद्याचा समावेश असून हा आशियातील आतापर्यंतचा सर्वाधिक अशा १७.६ मीटर रुंदीचा बोगदा ठरणार आहे. तसेच त्याची उंची ९.१२ मीटर राहणार असून हा बोगदा सुरू झाल्यावर घाट केवळ आठ मिनिटात पार करता येणार आहे. त्यातून वाहतुकीच्या वेळेत मोठी बचत होणार आहे. या बोगद्यात आगीची घटना घडताच स्वयंचलित स्प्रिंकलरद्वारे आग विझविली जाणार आहे. तसेच डेन्मार्क तंत्रज्ञानाने युक्त अशी यंत्रणा बोगद्यात उभारण्यात आली आहे.

समृद्धी महामार्गावरील हा ७६ किमीचा टप्पा सर्वात किचकट आहे. यामध्ये तब्बल १७ दऱ्या आहेत. त्यावर १७ पुलांची उभारणी केली आहे. त्यांची एकत्रित लांबी तब्बल ११.५ किमी आहे. सर्वाधिक लांबीचा व्हॅलीपूल २.२८ किमी लांबीचा असून तो भातसा नदीवर उभारण्यात आला आहे.